1st August 2013
ISSN No. 2278 - 7348

Vol. IInd, Issue 1st

# VIDYASEARCH

A Quarterly International journal in
Arts, Fine Arts, Humanity, Education and Law

Vidya Tonpe
Editor

# INDEX

1) **Right of Accused to get Bail** ........................................ 1
Yogesh Ashok Mahajan

2) **Multimedia & Traditional Education in Indian Schools & Colleges** ......... 7
Suryawanshi S. M.

3) **India-Bangladesh Trade Agreements and Economic Relations** ........................................ 17
Prof. Dr. Usha Yashwant Salunke.

4) **Immunization in Special Circumstances** .................. 29
Dr. Kaustubh Y Salunke, Dr. P. S. Kesarale

5) **Prevention of Parent to Child Transmission of HIV (PPTCT)** ........................................ 34
Dr.Harshad A Mali Dr.P.S.Kesarale

6) **अध्ययन शैली : संकल्पना व प्रतिमाने/प्रकार** .................... 43
मनिषा वसंतराव जगताप

7) **हिन्दी के अन्तिमदशक एवं प्रथम दशक के उपन्यास साहित्य मे नारी विमर्श** ................ 49
डॉ. मृदुला वर्मा

8) **'ओ अहल्या' खंडकाव्य की अपराजिता नारी** .................... 57
डॉ. विजया जगन्नाथ पिंजारी

9) **१९८० नंतरची आदिवासी मराठी कविता** ...................... 62
प्रा. डॉ. राजेंद्र ठाकरे

10) **अहिराणी कूटप्रश्नातून व्यक्त होणारे ग्रामीण जीवन** .............. 72
राजपूत भुपेंद्रसिंग देवबा

11) **धनगरी लोकसाहित्य परिचय जतन व संवर्धन** .................... 76
श्रीमती सोनवणे नीता मुरलीधर

ISSN No. 2278 - 7348
VIDYASEARCH
International Journal in Arts, Fine Arts, Humanity, Education and Law

# १९८० नंतरची आदिवासी मराठी कविता

प्रा. डॉ. राजेंद्र ठाकरे
सहयोगी प्राध्यापक, महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा जि. अहमदनगर

स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेमागे सुमारे सातशे वर्षाची परंपरा जरी असली तरी प्रस्थापितांनी आदिवासींना आपल्या साहित्यात कोणतेच स्थान दिले नाही. आदिवासींच्या जीवनदु:खाची अपेक्षा करणेच मुळात चुकीचे आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये विविध वाङ्मयप्रवाह निर्माण झालेत. त्यात दलित साहित्याचा उल्लेख करणे अपरिहार्य ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा उद्घोष होऊन दलित साहित्याची निर्मिती झाली. शोषणाधिष्ठीत समाज व्यवस्थेला, प्रस्थापितांच्या अन्यायमूलक संस्कृतीला नकार देऊन समताप्रधान संस्कृतीचे स्वप्न साकार करण्यासाठी स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांचा स्वीकार दलित साहित्याच्या माध्यमातून केला. गावकुसाबाहेरचे दारुण दु:ख कवितेच्या माध्यमातून आविष्कृत झाले. मात्र आदिवासींचे जीवनदु:ख दलित साहित्यिक चितारू शकले नाहीत. आदिवासी तरुणांची पहिली पिढी शिकून साहित्यात आपले जीवन, आपले स्थान शोधू लागली. यातूनच वेदनाविद्रोहाचे साहित्य मोठ्या धैर्याने आदिवासी कवी मांडू लागले. त्यात भुजंग मेश्राम, वाहरु सोनवणे, डॉ. विनायक तुमराम, वामन शेळमाके, नेताजी राजगडकर, रवी कुरसंगे, डॉ. गोविंद गारे, रा. चि. जंगले, कुसूम अलाम, कृष्णकुमार चांदेकर, सुनील कुमरे, वसंत कुलसंगे इत्यादी अनेक कवी विद्रोहाचा अंगार बरसवू लागली.

विद्रोही कवी भुजंग मेश्राम यांनी गोंडी बोलीभाषेत 'आदिवासी कविता' हा काव्यसंग्रह प्रकाशित केला. आदिवासींमध्ये स्वत्त्वाची भावना निर्माण करणारा, उद्याच्या निर्णायक युद्धासाठी आदिवासींची मने काव्याच्या माध्यमातून फुलविणारा कवी म्हणजे भुजंग मेश्राम होत. स्वातंत्र्य, समता व बंधुता या मुल्यांचा स्वीकार करणारी त्यांची कविता क्रांतीदर्शी आहे. अंधश्रद्धेला त्यांनी विरोध केला आहे. 'आदिवासी कविता' या भुजंग मेश्राम यांच्या कविता संग्रहाविषयी डॉ. विनायक



ISSN No. 2278 - 7348
VIDYASEARCH
International Journal in Arts, Fine Arts, Humanity, Education and Law

तुमराम म्हणतात, 'भुजंग मेश्राम यांची एकूण कविता आदिमांच्या वर्तमान जीवनाची व्यथा, वेदना मांडणारी आहे. परिवर्तन हे तिचे स्वप्न असले तरी आदिमांच्या सांस्कृतिक आणि सामाजिक दोषांच्या बाबतीत ती क्षमाशील नाही.'

'मोहोळ'च्या प्रस्तावनेत नेताजी राजगडकर म्हणतात, 'या देशाचे देशपण पहाडासारख्या छातीवर पेलणाऱ्या आदिम समाजाच्या विकासाच्या टप्प्यात आजची आदिवासी कविता उभी आहे. समस्त शोषित, पीडित, दलित आणि कष्टकऱ्यांच्या लढ्यात हीच कविता उद्याच्या निर्णायक युद्धाची ललकारी ठरेल.'

आदिवासी कवींचा पहिला प्रातिनिधीक काव्यसंग्रह म्हणूनच 'मोहोळ'कडे बघावे लागते. कवितेतून उद्याच्या समतेसाठी निर्णायक युद्धाची ललकारी पुकारण्यासाठी या कविता निर्माण झाल्या आहेत. आदिवासींकडे आजही प्रस्थापित समाज म्युझियमचे दालन सुसज्ज करण्याचे एक माध्यम म्हणून बघतो. 'मुक्तीचा संदर्भ' या कवितेत वामन शेळमाके म्हणतात, 'हे वनवासीपुत्रा, तुला गुलामीच्या जोखडातच प्रस्थापितांनी बंदिस्त करून ठेवलय. एका अर्थाने काटेरी पिंजऱ्यासमान हे जीवन घुसमटायला लावणारे आहे.' म्हणूनच कवी म्हणतात,

जन्मलास तू काटेरी पिंजऱ्यात
वाढलास गुलामीच्या काळोखात
पण तुला शपथ घेऊन सांगतो आहे
मरु देणार नाही तुला
या वणव्याच्या पसाऱ्यात
येत आहोत आम्ही

तुझ्या मुक्तीचा संदर्भ घेऊन 'प्रस्थापितांची निव्वळ दयादृष्टी ही आदिवासींचे उत्थान करूच शकत नाही याची आत्मजाणीव कवींना आहे. स्वातंत्र्य मिळूनही स्वातंत्र्याचा प्रकाश आदिवासींपर्यंत जाऊ शकला नाही याची खंत कवींना वाटते. म्हणूनच ते म्हणतात,

अरे, इथल्या प्रस्थापितांची
भूमिका इतकी टाकाऊ आहे

की, इथं माणून म्हणून
जगता येत नाही

आपले उत्थान आपणच करायला हवे असे कवींना वाटते, ते म्हणतात

इथं मागून काही मिळत नसतं
सर्व मिळवून घ्यावं लागतं

आयुष्याला मूठभर माती देऊन आपल्या अधिकाराची जाणीव कवितेच्या माध्यमातून कवी करून देतात. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आदिवासींची व्यथा विजयकुमार मडावी अत्यंत वास्तवरित्या मांडतात. स्वातंत्र्याचा सूर्यप्रकाश आदिवासींपर्यंत येण्याआगोदरच लुप्त झाला. आदिवासींचे दारिद्र्य नष्ट व्हावे यासाठी प्रगतीच्या विविध योजना शासनाने काढल्या, पण

कुणी पळविली पोळी सवलतींची
जंगलातच राहिला
जंगलचा राजा
त्याच्या नावाने केली दुसऱ्याने मजा

विकास योजनेचे आराखडे कागदावरच राहिले. आदिवासींचे दु:ख त्यांचेच राहिले. या भारत देशातला आदिवासी विविध जमातीत विभागला गेला आहे. त्यांच्यात ऐक्य नाही, म्हणूनच तो दुर्बलतेचे जीवन जगत आहे. ऐक्याच्या ताकदीवर शतकानुशतकांची व्यथा संपू शकते.

उत्तमराव धोंगडे यांच्या 'वनवासी' या काव्य संग्रहाविषयी डॉ. विनायक तुमराम लिहितात, 'स्वत्व जागरणाच्या प्रक्रियेला कुठेतरी आणि कुणीतरी सुरुवात करावी असे कवीला वाटते. म्हणून दुसऱ्याच्या आगमनाची वाट न पाहता वनपुत्रांच्या मुक्तीचे रणसिंग कवीने स्वत: फुंकले आहे.'

आदिवासींच्या व्यथा वेदनांचे दु:ख 'वनवासी' या काव्यसंग्रहातून कवीने मांडले आहे. अंधश्रद्धेवरही भाष्य त्यांनी केले आहे. आदिवासींमधील दुष्ट रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, आळशीपणा या गोष्टी आदिवासी विकासाला मारक ठरत आहेत असेही कवी ठामपणे सांगतात.

'गोधड' वाहरु सोनवणे यांच्या चरित्रावरून त्यांचे कवितेशी नाते किती जवळचे





आहे याचा बोध होतो. त्यांची घडण चळवळीने केली. मार्क्सवाद, फुले, आंबेडकरवाद यांचे विचार मानणाऱ्या संघटनेत ते सक्रीय कार्यकर्ते आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यासाठी चळवळीच्या माध्यमातून ते लढा देत होते. संघर्ष करीत असतांना त्यांच्यावर मर्यादा पडल्या. वैचारिक मंथन होऊन आपले विधायक विचार तळागाळातील लोकांपर्यंत जावेत, शिवाय बुद्धीजीवी वर्गातही जावेत म्हणून त्यांनी आपले विचार कवितेतून मांडले. दीनदुबळा, दलित, आदिवासी, मजूर, कामगार यांच्यात स्वत्वाची भावना जागरुक करून येथील शोषणाधिष्ठित समाजव्यवस्थेला नेस्तनाबूत करून, पहाडासारख्या दबलेल्या दलित, आदिवासी, मजूर यांच्या शक्तीचा वापर वर्णविरहीत समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी कवी आपल्या कवितेतून परिवर्तनाचा आलोक देतात. काव्यसंग्रहाला गोधड हे नाव दिले ते योग्यच आहे. ही 'गोधड' आदिवासींची मने चेतवणारी आहे. चेतना ही परिवर्तनाची जननी आहे. वाहरु सोनवणे म्हणतात, 'गोधड' या काव्य संग्रहाचा जाणकार चुकीचा अर्थ लावतात. ही गोधड आदिवासींच्या व्यथा वेदनांची गोधड नसून येथील सडलेल्या, फाटलेल्या समाज व्यवस्थेची ही गोधड आहे, ती बदलण्याची वेळही आली आहे. ही फाटलेली गोधड शिवता येणार नाही. आता नवीन अशी समताप्रधान संस्कृतीची गोधड निर्माण करावी लागेल.

वाहरु सोनवणे स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करतात. केवळ आदिवासी स्त्रीच नव्हे तर या विश्वातील स्त्री-पुरुष यांच्यात समता असली पाहिजे. भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीवरही कवी हल्ले करतात. मातृसत्ताक पद्धतीही त्यांना नको आहे. 'समताप्रधान संस्कृती' हेच त्यांचे ब्रीदवाक्य आहे. माणूस हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे याची प्रगल्भ जाणीव कवींना आहे. येथील न्यायव्यवस्था आदिवासींना न्याय देऊ शकत नाहीत. येथील कायदा समान असला तरी न्याय देणारी व्यक्ती ही संकुचित असल्यामुळे कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे दुर्बलांना अडकविण्यासाठी कायद्याचा वापर होतो. कारण येथील विषम समाज व्यवस्था होय. प्रसंगी समतेसाठी रक्तरंजित क्रांतीचाही ते पुरस्कार करतात. कारण -

जखमांनीच जगतोय मी
जखमाच जगवतात मला

माणुसकीची वाटचाल
जखमाच दाखवितात मला

वाहरु सोनवणेंची चळवळी संदर्भातली भूमिका महत्त्वाची आहे. ते म्हणतात, 'चळवळ म्हणजे माणुसकीचा गाभा, सतत विकसित होत जाणारा प्रवाह होय.'

'गोंडवन पेटले आहे' आपल्या या काव्यसंग्रहाबद्दल विनायक तुमराम लिहितात, 'माझ्या कविता हेच माझे मनोगत, तीच माझी अनुभूती. वनजीवनाचे जसे दर्शन तशीच अभिव्यक्ती. या अभिव्यक्तीला कुणी आक्रंदन म्हणतील, कुणी अंतर्मनाचा तळतळाट म्हणतील, कुणी भावनांचा उद्रेक म्हणती... कुणी काहीही म्हणोत, पण जे जसे आहे तसेच ते मांडले जाण्याची आवश्यकता होती. रानावनातील जगणे हे खऱ्या अर्थाने जगणेच नव्हे याची जाण त्या जगणाऱ्यांना करून देणे आवश्यक होते. हे समजूनच केवळ मी त्यांना जागविण्याचा प्रयत्न केला आहे तो काव्यरूपाने.

'गोंडवन पेटले आहे' या काव्यसंग्रहातून व्यक्त होणारी जाणीव ही हजारो वर्षे काळोख गिळंकृत करून दऱ्याखोऱ्यात अंधारमय जीवन जगणाऱ्या आदिमांना त्यांच्या शोषणापासून मुक्ती मिळावी ही आहे. कवी जरी त्यांचे दुःख मांडत असले तरी ते समुहाचे दुःख बनते. कवी विद्रोह व्यक्त करतांना म्हणतात, मी जाळून टाकतो प्रस्थापितांची निर्लज्ज तत्त्वज्ञान माझ्या आयुष्याची जात विचारतात. कवी मानवी मूल्यांचा स्वीकार करणारा आहे. म्हणूनच आदिवासींना मुक्ती मिळावी, त्यांचा गौरव माणूस म्हणून व्हावा असे त्यांना वाटते. क्रांतीची फुले उधळणारे कवी व कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी त्यांची कविता जन्माला आली आहे.

'ऊलगुलान' भुजंग मेश्राम या विद्रोही कवीने हा कविता संग्रह लिहिला आहे. आपल्या काव्यसंग्रहाबद्दल ते लिहितात, 'ऊलगुलान' म्हणजे सर्व क्षेत्रात एकाच वेळी उठाव करणे. बिरसा मुंडाच्या चळवळीमधील कृती कार्यक्रमाची ही घोषणा होती. बिरसा मुंडाने सर्व पातळ्यांवर त्याचा अंमल केला. ऊलगुलान हे माझ्या काव्यसंग्रहाचे नाव झाले आहे. कारण माझी कविता सर्व पातळ्यांवर वावरते. संवाद साधते. आर्थिक सामाजिक समता निर्माण करण्यासाठीच त्यांची कविता निर्माण झाली आहे. माणूस या मूल्यासाठीच त्यांची कविता क्रांतिसन्मुख जाणीव





निर्माण करते. म्हणूनच नेताजी राजगडकर मेश्रामांच्या कवितेविषयी लिहितात, 'ऊलगुलान' हा आदिवासी साहित्याचा जाहीरनामा आहे. एकाचवेळी सर्व पातळ्यांवर उभी राहणारी ही कविता आहे.

'जागवा म्हणे पेटवा मशाली' प्रा. वामन शेळमाके यांचा हा काव्यसंग्रह आहे. देशातला खरा भूमिपुत्र रानावनात अत्यंत संघर्षप्रवण जीवन जगत आहे. प्रस्थापित मात्र अत्यंत धुर्तपणे आदिवासींना काटेरी पिंजऱ्यात बंदिस्त करीत आहे. आदिवासी संस्कृतीचे गुणगान करून त्या संस्कृतीचा धंदा प्रस्थापित करीत आहे. म्हणूनच आदिवासींच्या मुक्तीसाठी त्यांची कविता निर्माण झाली आहे. स्वातंत्र्य मिळूनपन्नास वर्षाच्या पुढे काळ लोटला तरी स्वातंत्र्याच्या सूर्याची किरणे आदिवासींच्या झोपडीत, कुडाच्या छपरात गेली नाहीत. जगण्यासाठीच त्यांना संघर्ष करावा लागतो. आदिवासींच्या कला, नृत्याच्या नावावर पांढरपेशी मंडळी आपली स्वार्थाची पोळी भाजतात तेव्हा कवींना वाईट वाटते. कवी दुःखी होतात. येथील वर्णीय व्यवस्थेची कवींना चीड आहे. 'ज्यांनी समस्त आदिवासी पुत्रांचे केले शोषण, त्यांच्या रक्ताने लिहिणार आहे रक्तरंजित इतिहास' असे कवी म्हणतात. भ्रष्टाचाराच्या भस्मासुराने आदिवासींचे जीवन उद्ध्वस्त करून टाकले आहे. प्रशासनात काम करणारी टोळी आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना लुबाडताना दिसते. म्हणून कवींना जागृती अपेक्षित आहे.

'म्होरकी' हा व्यापक आयाम घेऊन येणारा उषाकिरण आत्राम यांचा काव्यसंग्रह आहे. जगातल्या तमाम शोषित, पीडीत, अन्यायग्रस्त, महात्यागी, जगनिर्मात्या माता भगिनींना व इमानदार आदिवासी शोषित समाजास हा काव्यसंग्रह अर्पण केला आहे. 'शब्दशस्त्र' या कवितेत शब्दांचे सामर्थ्य कवयित्रीने मार्मिकपणे मांडले आहे. त्या म्हणतात,

गड्या, शस्त्र आता तूच हो अस्त्र आता तूच हो,
फुटू दे शब्दांना शस्त्राचे पाते पेटू दे शब्दांच्या वाती
उजळू दे मना मनाच्या नाती शब्दच अस्त्र, शब्दच शस्त्र,
शब्दच युद्धा, शब्दच बुद्ध

सामाजिक समता निर्माण करण्यासाठी उषाकिरण आत्राम शब्दांचा शस्त्र,

अस्त्र म्हणून वापर करतात. कवयित्री 'तयार' या कवितेत म्हणतात दगडी देवाच्या देवालयात वाजलेली घंटा ऐकून गाव धावतो. हाडामांसाचा मी माणूस रान कपारीत आक्रोश करतो. माझा आक्रोश ऐकून गाव दूर पळतो. अनादिकालापासूनच हा प्रवास सुरू आहे. या देशात दगडांना किंमत आहे. पण माणूस या मूल्याला किंमत नाही. आदिवासींचे दुःख प्रस्थापिताने कधीच समजून घेतले नाही. अंधारलेल्या दलदलीवर कमलपुषंचे ताटवे फुलविणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्या अभिवादन करतात. डॉ. आंबेडकरांची विचारसरणी ही मानवी मूल्यांना महत्त्व देणारी आहे. म्हणूनच त्या आदराची भावना व्यक्त करतात. या काव्यातील स्त्रीदर्शन जागृतीकडे वाटचाल करणार आहे. येथील स्त्री सामाजिक समतेसाठी क्रांतीची मशाल हाती घेऊन अन्यायाविरुद्ध पेटून उठणारी आहे.

'रान आसवांचे तळे' या काव्यसंग्रहाच्या मनोगतात कवयित्री कुसूम अलाम लिहितात, 'हा समाज भुकमुक्त व्हावा, जुलूममुक्त व्हावा, सामाजिक सुसंगती साधावी या विश्वात समता नांदावी, येथील मानवता समृद्ध व्हावी, या धरणीवर मानवतेचे नंदनवन फुलावे, सारे मानवी जीवन मंगलमय व्हावे असे स्वप्न उराशी धरून हे माझे लिहिणे आहे...' कुसूम अलाम यांना विषमतेवर प्रहार करायचा आहे. दलित साहित्य चळवळीने साहित्यातून वेदनेचा जसा अंगार फुलविला तसा आदिवासी साहित्यातूनही अंगार फुलवायचा आहे. स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव एकीकडे साजरा होत असताना या भूमिपूत्रांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. शासनाने आदिवासी विकासासाठी दिलेल्या सवलती मध्येच पळविणारी अधिकाऱ्यांची एक टोळीच निर्माण झाली आहे. पोटाच ज्वलंत प्रश्नासाठी

कंदमुळे अजूनही खातो आम्ही
किड्यामुंग्याही भक्षितो अजुनी
असेल जगणे का आमच्या नशिबी?

या स्वातंत्र देशात अन्न, वस्त्र, निवारा या गरजाही आदिवासी पूर्ण करू शकत नाही. स्त्रियांची स्थितीही अत्यंत दयनीय आहे. अंग झाकायला वस्त्र नाही, म्हणूनच या शोषण यंत्रणेविरुद्ध सर्व आदिवासींनी एकत्र येऊन लढा दिला पाहिजे. विकास योजनेचा लाभ घेण्यासाठी आदिवासींमध्ये जागृती होणे गरजेचे आहे. भ्रष्टाचारी





प्रवृत्ती स्वातंत्र्योत्तर कालखंडाचे अपत्य नसून ती प्राचीन कालापासून चालत आलेली परंपरा आहे. त्याविषयी कुसूम आलाम म्हणतात,

एकलव्याचा कोणता अपराध होता
की त्याचा अंगठा हिसकावून
भ्रष्टाचाराची सुरूवात करावी गुरुने?

अशा या कपटी गुरुचा कवयित्री धिक्कार करते. आदिवासी स्त्रियांनी शोषणाविरुद्ध आवाज उठवायला हवा, असेही कवयित्री म्हणते.

'पतुसा' हा काव्यसंग्रह कृष्णकुमार चांदेकर यांनी लिहिलेला आहे. पतुसा हे शीर्षकच सूचकता व्यक्त करणारे आहे. कृष्णकुमार चांदेकर हे कवी पुरोगामी चळवळीत कार्यकर्त्याची भूमिका तळमळीने निभावणारे अस्सल कार्यकर्ते आहेत. 'पतुसा' हा गोंडी शब्द आहे. पतुसा म्हणजे जाळणे, प्रस्थापितांची शोषणप्रवण समाजव्यवस्था जाळून समतेचे स्वप्न पाहणारी त्यांची कविता क्रांतदर्शी आहे. भूकेची भीषणता व्यक्त करताना कवी म्हणतात,

ज्या देशातल्या मंदिर, मशिदीतून
चप्पल जोडे चोरल्या जात असतील
त्या देशातील्े क्रांची गरज काय असेल?
राम, रहिम की भूक?

भूकेचा ज्वलंत प्रश्न त्यांची कविता मांडते 'उपोषण' या कवितेत प्रस्थापितांना गांधीजींनी दिलेल्या उपोषणाचा उपहास करत कवी म्हणतात,

उपोषणकर्त्यांनी बसू नये
दवाखान्याच्या हद्दीत
असेल एवढा कंड तर
त्यांनी यावं आमच्या वस्तीत

आदिवासींचे दररोजच उपोषण होत असते. भूकेची भीषणता आदिवासी दररोज अनुभवतो. म्हणूनच कृष्णकुमार उपोषणाचा उपहास करतात. घटनेने आरक्षण दिले असले तरी संरक्षण दिले नाही. आरक्षणाचा ज्यांना ज्यांना लाभ झाला त्यांचे जीवन सुखी झाले आहे. असा समाधानी भाव कवी व्यक्त करतात.

'रानपाखरांची माय' या कवितासंग्रहात आदिवासींचे वास्तव कुसूम आलाम मांडतात.

स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षात
व्यथा माझी अशी आहे
छातीवरती बंदूक आणि
पाठीमागे दंडूक आहे

आजही आदिवासी सुरक्षित नाही. नक्षलवाद्याच्या बंदूकांचा तो बळी ठरत आहे. देशाचे रक्षण करणारी पोलीस यंत्रणा ही त्याचे शोषण करीत आहे. म्हणूनच

झाले सोसून सोसून ऊठ वेगी वेगी जावू

तीर कामठ्याची धार आता लेखनीला आहे. अशा प्रकारे लेखणीच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनो स्वप्न कवयित्री पाहते. प्रस्थापितांनी विकासाच्या नावाखाली आदिवासींना विस्थापित केले. आदिवासींचे वनवैभव नष्ट केले. त्यांची संस्कृती उद्ध्वस्त केली. म्हणूनच रानाची लेक माय होवून आदिवासींची मने चेतवते.

अशा प्रकारे एकूण पस्तीस काव्यसंग्रह १९८० नंतर प्रकाशित झाले आहेत. अनेक नियतकालिकांमधूनही आदिवासी कवींनी आपल्या कविता प्रकाशित केल्या आहेत. सामाजिक बांधिलकी स्वीकारून या कवींनी कविता लिहिल्या आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञाननिष्ठा, माणूसकी, भूक, लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांचा स्वीकार करणारी ही कविता आशयसंपन्न आहे. या आदिवासी कवितेने अनेक प्रश्न निर्माण केले आहेत.

आदिवासींचे जीवन साहित्यातून समजून घेण्यासाठी व साहित्य प्रवाह व्यापक होण्यासाठी जमातीच्या वेगळ्या संस्कृती कोशाची, बोली समजण्यासाठी शब्दकोशाची आवश्यकता अनेक काव्यसंग्रहांनी निर्माण केली आहे. आदिवासींचे जीवन समजून घेणारा तेथील प्रादेशिकतेचा, पर्यावरणाचा अभ्यास असणारा समीक्षक आदिवासींच्या कवितेला, साहित्यकृतीला न्याय देवू शकतो. अशा बहुश्रुत, अभ्यासू आस्वादक समीक्षकाचा प्रश्न कलाकृतीने निर्माण केला आहे. फॅनखाली बसून कलाकृतीची समीक्षा करणाऱ्या समीक्षकाला हे एक आव्हान





आहे. जीवनमूल्य व कलामूल्य यांचा गर्भित गाभा शोधण्याची गरज आदिवासी कवितेने निर्माण केलेली आहे. आकृतिवादी दृष्टीकोन येथे पुरेसा न्याय देवू शकत नाही. म्हणून Socio Anthropological Approach हा दृष्टीकोन आदिवासी कवितेला न्याय देऊ करतो. कारण आदिवासी कवींचे जीवन आणि त्यांचे काव्य यांचा अतूट संबंध आहे. श्रम करण्याची तयारी असूनही या स्वतंत्र देशात आदिवासींना रोजगार मिळू शकत नाही, हे एक भयान वास्तव आहे. रोजगाराचा मोठा प्रश्न आदिवासी कवितेने निर्माण केला आहे. आदिवासी स्त्री मुक्त आहे असा डांगोरा पिटला जातो. पण ती खरोखरच मुक्त आहे का? याचे नातेसंबंध तपासण्याचा प्रश्न आदिवासी कवितेने निर्माण केलेला आहे.

## संदर्भ ग्रंथ


१) आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा, डॉ. विनायक तुमराम
२) आदिवासी कविता एक आकलन : डॉ. राजेंद्र ठाकरे
३) मोहळ : कवितासंग्रह, संपादक भुजंग मेश्राम, प्रभू राजगडकर
४) गोधड : कवितासंग्रह, वाहरु सोनवणे
५) गोंडवन पेटले आहे, कवितासंग्रह, विनायक तुमराम
६) जागवे मने पेटवा मशाली, कवितासंग्रह, प्रा. वामन शेळमाके
७) म्होरकी, कवितासंग्रह, उषाकिरण आत्राम
८) रान आसवांचे तळे, कवितासंग्रह, सौ. कुसूम आलाम
९) आंबेडकरवादी मराठी साहित्य, डॉ. यशवंत मनोहर
१०) मनोगत, कवितासंग्रह, माधव सरकुंडे
११) पतुसा, कवितासंग्रह, कृष्णकुमार चांदेकर
१२) रानपाखराची माय, कवितासंग्रह, कुसूम आलाम


•••